# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक २८४/२०२४ दिनांक- ०६/०८/२०२४.

**"कार चोरी करणा-या आरोपीतास अटक करुण त्याच्याकडुन ०४ चोरीच्या कार हस्तगत करुण एकुण ०४ चारचाकी चोरीचे गुन्हे उघड करण्यात काशीगांव पोलिस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला यश"**

दिनांक ३०.०६.२०२४ रोजी फिर्यादी नांमे विष्णु विठ्ठलराव फड, रा. बी विंग रु नंबर ३०४, जय मिरा अपार्टमेंट, जीसीसी क्लब जवळ, हाटेकश, मिरारोड पुर्वे, ठाणे यांनी काशिगांव पोलिस स्टेशन येथे तक्रार दिली कि, दिनांक २६.०६.२०२४ रोजी फिर्यादी यांनी त्यांच्या स्वताच्या मालकीची एम.एच.०४ जे.व्ही ११२२ या क्रमांकाची मारुती कंपनीची वॅगेनार कार त्यांनी त्यांच्या राहात्या पत्त्यावर बिल्डींगच्या बाहेर रस्त्याच्या कडेला पार्क करुण ठेवली होती. दिनांक ३०.०६.२०२४ रोजी सकाळी त्यांनी पार्क केलेल्या ठिकाणी कार घेण्यासाठी फिर्यादी गेले असता त्यांना त्यांची वरिल नमुद वर्णाची वॅगेनार कार दिसुन आली नाही. दि.३०.०६.२०२४ रोजी त्यांच्या फिर्यादी वरुन काशिगांव पोलिस स्टेशन गु.र.नं १८१/२०२४ भा.द.वि कलम ३७९ प्रमाणे अनोळखी इसमा विरुद्ध चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्ह्याच्या तपासात घटनास्थळाच्या आजुबाजुचे सीसीटीव्ही फुटेजव्दारे आरोपीताचा शोध घेत असतांना पुन्हा दिनांक ०३.०४.२०२४ रोजी फिर्यादी नांमे चंद्रकांत सदाशिव धागड,वय ६८ वर्षे ,व्यवयाय –नोकरी रा. रुम नं.ए/ विंग ४०२ न्यु ग्रीन वुड कॉम्प्लेक्स सेंटझेवीयस हायस्कुल,मिरा रोड पुर्वे यांच्या मालकीची. एम.एच ०४, के.आर ८२४९ क्रमाकाची मारुती सुझुकी कंपनीची वॅगेनरा कार चोरी गेली होती. फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन काशिगांव पो.स्टे गु.र.नं १८४/२०२४ बी.एन.एस ॲक्ट कलम ३०३(३) प्रमाणे अऩोळखी इसमा चोरीचा विरुद्ध गुन्हा दाखल आहे.

पोलीस ठाणेच्या हद्दीत वारंवार चारचाकी वाहनाच्या चोरीचे गुन्हे घडत असल्याने वरिष्ठांनी आरोपीताचा शोध घेवुन नमुद गुन्हे उघड करण्याच्या सुचना दिल्या होत्या त्या प्रमाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सलग २० दिवस आरोपी येण्याच्या व जाण्याच्या मार्गाचे १०० पेंक्षा जास्त ठिकाणाचे सीसीटीव्ही फुटेज चेक केले तसेच सलग १० दिवस ट्राम्बे, गोवंडी,घोटकोपर इत्यादी भागात संशयित इसमाचा शोध घेतला असता वरिल नमुद गुन्ह्यात दिनांक ०३.०७.२०२४ रोजी आरोपी नांमे **अहमदअी नियमत अली शेख,** रा. प्लॉट नं. १९, रोड नंबर १०, लाईन नं. एच, रुम नं. ०६, बैगनवाडी, गोवंडी, शिवाजी नगर, मुबंई यांस अटक करण्यात आली आहे.

अटक आरोपी नामे अहमदअली शेख याच्या ताब्यातुन खालील नमुद वर्णनाच्या कार हस्तगत करण्यात आल्या असुन एकुण चार गुन्हे उघड करण्यात आले आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं/कलम | जप्त करण्यात आलेले वाहन |
|---|---|---|---|
| १. | काशिगांव पोलिस ठाणे | १८१/२०२४ भा.द.वि कलम ३७९ प्रमाणे | मारुती कंपनीची वॅगेनार कार रजि.नंबर एम.एच. ०४ जे.व्ही ११२२ |
| २. | काशिगांव पोलिस | १८४/२०२४ भारतीय न्याय | मारुती कंपनीची वॅगेनार कार रजि.नंबर |

| | | | |
|---|---|---|---|
| | ठाणे | संहिता चे कलम ३०३(२) प्रमाणे | एम.एच. ०४ के.आर. ८२४९ |
| ३. | मिरारोड पोलिस ठाणे | १७९/२०२४ भा.दं.वि.कलम ३७९ प्रमाणे | मारुती कंपनीची सेलेरिव्हो कार रजि.नंबर.एम.एच ०१ जि.जे.८१९५ |
| ४. | विलेपार्ले पोलिस ठाणे, मुंबई. | ५३७/२०२४ भा.द.वि. ३७९ प्रमाणे. | मारुती कंपनीची वॅगेनार कार रजि.नंबर एम.एच. ०२ ई.ई. २३७५ |

वरिल नमुद गुन्हे उघड करुण आरोपीताच्या ताब्यातुन सदर कार जप्त करण्यात आलेले आहे. तसेच अटक आरोपी सोबत चोरी करण्या करिता असलेला त्याचा साथीदार बबलु शेख, पत्ता गोवंडी, मुंबई हा फरार असुन त्याचा शोध सरु आहे. त्याचा शोध घेवुन त्यांनी या व्यतिरीक्त मुंबई, ठाणे, पालघर इत्यादी परिसरात कार चोरी केल्याची शक्यता असुन त्या अनुषंगाने अटक आरोपीताकडे पुढील तपास पोलिस उप निरीक्षक किरण बगडाणे व पोलिस उप निरीक्षक अभिजीत लांडे हे करत आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रकाश गायकवाड, पोलिस उप आयुक्त परिमंडळ ०१, डॉ विजय मराठे, सहाय्यक पोलिस आयुक्त, मिरारोड विभाग, श्री. राहुलकुमार पाटील, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, काशिगांव पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली काशिगांव पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी/अंमलदार यांनी केली आहे.

--------oooo--------